दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com | RNI No.MAHMAR/2019/79184
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ७५ वा ▶ शुक्रवार दि.१९ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### मारुती मंदिरातून पंचधातूची मूर्ती लंपास

**शिंदखेडा ।** शहरातील गांधी चौकात दक्षिणमुखी मारुतीचे पुरातन मंदिर होते. या मंदिराचा जीर्णोद्धार करून भव्य मंदिर उभारण्यात आले. मंदिरात भाविकांसाठी पूजेसाठी श्री हनुमंताची पंचधातूची उत्सवमूर्ती ठेवण्यात आली आहे. मूर्ती सुमारे आठ किलो वजनाची होती. मूर्ती १६ जानेवारीला दुपारी पावणेबाराच्या सुमारास चोरट्यांनी नेली. सायंकाळी नेहमीप्रमाणे भाविक आरतीसाठी मंदिरात आले असता मूर्ती चोरीस गेल्याची बाब उघड झाली. मंदिरातील सीसीटीव्ही फुटेज मंदिराच्या पदाधिकाऱ्यांनी पाहिले असता एक दिव्यांग व्यक्ती मूर्ती नेत असल्याचे दिसत आहे.

### ॲपेरिक्षाला अपघात; एक ठार, दोन जखमी

**धुळे ।** सुरत-नागपूर महामार्गावरील कोंडाईबारी (ता. साक्री) घाटात एका वाहनाने ॲपेरिक्षा (एमएच १८, डब्ल्यू (९६१०)ला हलकावणी दिल्याने अपघात झाला. त्यात रिक्षातील शेकलाल सीताराम साबळे ठार झाले, तर तुकाराम उखड्या पवार व तेजाराम पंडित बागूल जखमी झाले.

### नायलॉन मांजा विक्री, व्यापाऱ्यावर गुन्हा

**धुळे ।** शिरपूर शहरातील रथगल्ली वरचे गाव येथील महावीर प्रोव्हिजन दुकानावर पोलिसांनी छापा टाकत ३० हजारांचा नायलॉनचा मांजा जप्त केला. पोलिसांनी या दुकानात सायंकाळी पावणेसात वाजेच्या सुमारास छापा टाकला. एकूण ३० हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिस कर्मचारी मनोज महाजन यांच्या तक्रारीवरून व्यापारी हरीश हंसराज जैन यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

# दुपटीपेक्षा अधिक मालमत्ता कर न आकारण्याबाबत प्रधान सचिवांचे आदेश

### आ.फारुख शाह यांच्या अथक प्रयत्नांना यश

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महापालिकेने घरपट्टीत मोठ्या प्रमाणात वाढ केली असून अनेकांना दुप्पट ते पाचपट घरपट्टी आकारण्यात आली आहे. यामुळे धुळेकरांमध्ये प्रचंड असंतोष आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा देण्यासाठी शहराचे आमदार फारुक शाह यांनी थेट मंत्रालय स्तरावर प्रयत्न चालविले होते. यासाठी त्यांनी नगरविकास प्रधान सचिवांची भेट घेत धुळे शहराची वस्तुस्थिती मांडली होती. त्यानुसार प्रधान सचिवांनी धुळेकरांना दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. महापालिकेने धुळेकरांवर अनेक पटींनी लादलेली वाढीव घरपट्टी रद्द करण्यात यावी तसेच धुळे शहरातील मालमत्ताधारकांना दुपटीपेक्षा अधिक कर आकारु नये, असे स्पष्ट निर्देश प्रधान सचिवांनी दिले आहेत. त्यामुळे धुळेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महापालिकेने मोठ्या प्रमाणात घरपट्टी आकारल्यामुळे गरीब नागरिकांना भरणे अशक्य होत असल्याची बाब आ.शाह यांनी प्रधान सचिवांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच शहराची परिस्थिती पाहता ज्याप्रमाणे महानगरपालिका ने ठराव करून घरपट्टी वाढ केलेली आहे ती घरपट्टी वाढ आपल्या स्तरावर रद्द करून वाजवी अशी घरपट्टी लावण्यात यावी, अशी मागणी आ.फारुक शाह यांनी प्रधान सचिवांकडे केली होती.



**धुळेकरांना दिलासा**

**आ.फारुक शाह यांनी शासनदरबारी सुरु ठेवलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. प्रधान सचिवांनी सकारात्मक निर्णय घेत धुळेकरांना दिलासा दिला आहे. महापालिकेने अनेक पटीने वाढ केलेली घरपट्टी रद्द करण्यात यावी आणि धुळे शहरातील मालमत्तांसाठी कराची आकारणी दुपटीपेक्षा जास्त करू नये असे स्पष्ट निर्देश नगर विकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज यांनी नुकतेच दिले आहेत. यामुळे धुळेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. वाढीव घरपट्टीतून दिलासा मिळाल्यामुळे धुळेकरांमधून समाधान व्यक्त होत आहे. याबद्दल धुळेकरांनी आ.शाह यांचे आभारही मानले आहेत.**

प्रधान सचिवांच्या दालनात झालेल्या बैठकीत आ.शाह यांनी धुळेकरांची कैफियत मांडली. धुळे शहर हे आर्थिकदृष्ट्या अति मागास शहर असून या शहरात मोठे उद्योग-धंदे नाहीत. परिणामी, शहरात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे. असे असताना महापालिकेने अवास्तव वाढीव घरपट्टी आकारली आहे. शहरातील नागरिकांना ही वाढीव घरपट्टी भरणे जिकरीचे होत आहे. धुळे शहर हद्दवाढ झाल्यामुळे शहरावर विकासकामाचा मोठा बोजा आहे, तसेच शासनाचा निधी कमी पडत असल्यामुळे शहराचा विकास होत नाही. शहरातील एमआयडीसी येथे जास्त उद्योग-धंदे नसल्यामुळे शहरातील असंख्य नागरिक बेरोजगार आहेत. शहरात यापूर्वी सुद्धा घरपट्टी वाढ करण्यात आलेली होती व आज देखील मोठ्या प्रमाणात नागरिकांकडून घरपट्टी वसूल केली जात असल्याचे आ.शाह यांनी प्रधान सचिवांसमोर मांडले.शहराची परिस्थिती पाहता ज्याप्रमाणे महानगरपालिका ने ठराव करून घरपट्टी वाढ केलेली आहे ती घरपट्टी वाढ आपल्या स्तरावर रद्द करून वाजवी अशी घरपट्टी लावण्यात यावी, अशी मागणी आ.फारुक शाह यांनी प्रधान सचिवांकडे केली होती.

# आनंद लोंढेच्या नेतृत्वात आजाद कार्यकर्त्यांचं प्रखर आंदोलन





**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शहर पोलिस स्टेशन समोर उभारलेला पुतळाच अनधिकृत असल्याचे सांगणार्या विनोद वाईन शॉपचे मालक गलानी यांच्याविरुध्द ॲट्रासिटीचा गुन्हा दाखल करा, आज आम्ही विनोद वाईन शॉपचा बोर्ड फोडला. येत्या पाच दिवसांच्या आत हे दुकान येथून हटवा अन्यथा दुकान ज्या दिवशी चालू राहील, त्या दिवशी फोडले जाईल. हे दुकान हटविले नाही तर पालकमंत्र्यांना २६ जानेवारीला झेंडावंदन करु देणार नाही, सामुहिक आत्मदहन करु असा इशारा आनंद लोंढे यांनी दिला आहे. आज आंबेडकरी अनुयायांसोबत लोंढे विनोद वाईन शॉप येथे आले. लोंढे यांचे आंदोलन नियोजीत असल्याने आधीच तगडा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. विविध सामाजीक संघटनांचे आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने आंदोलनासाठी आले होते. त्यांच्या भावना तिव्र होत्या.

आंदोलकांपैकी काहींनी काठ्यांनी विनोद वाईन शॉपचे बोर्ड फोडले. त्यानंतर माध्यमांशी बोलताना आनंद लोंढे म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून सामाजीक, राजकीय संघटनांमधील आंबेडकर अनुयायांनी विनोद वॉईन शॉप हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यामागील दुकान हटविण्यासंदर्भात निवेदने दिली. आंदोलने केली. २०२३ साल उलटून देखील हे दुकान हटलेले नाही. विनोद वाईन शॉपचे मालक नरेश गलाणी हे मात्र डॉ.आंबेडकर यांचा पुतळाच बेकायदेशिर ठरवत आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासनाने ॲट्रासिटीचा गुन्हा दाखल करावा.

आज आम्ही दुकानाचे बोर्ड फोडले आहे. येत्या पाच दिवसात दुकान येथून हलवावे या पाचदिवसात दुकान केव्हाही चालु दिसले तर आम्ही दुकान फोडू अशी घोषणा केली. आंदोलनानंतर निवेदन देण्यासाठी आंबेडकरी जनतेने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न केला असता त्यांना तेथेच पोलिसांनी अडविले. त्यानंतर त्यांना ताब्यात घेतले. आनंद लोंढे यांना शहर पोलीस ठाण्यात नेण्यात आल्यानंतर कार्यकर्त्यांनी पुतळा परिसरात ठिय्या देत विनोद वाईन शॉपचे नरेश गलाणीविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. दरम्यान शहर पोलीस स्टेशनच्या निरीक्षकांची बदली झाल्यामुळे त्या ठिकाणी आयपीएस अधिकारी ऋषिकेश रेड्डी यांनी तात्काळ धाव घेतली. रेड्डी यांनी सांगितले की २३ तारखेला वाईनशॉपच्या बाबतीत जिल्हाधिकारींकडे बैठक आहे. त्याआधी कायदा हातात घेणे योग्य नव्हते. महिन्याच्या अखेर वाईन शॉप बंद होणार अशी कठोर कारवाई करु असे सांगितल्यावर देखील त्यांनी त्या ठिकाणी जाऊन तोडफोड केली. कायदा हातात घेऊन खूप मोठी चूक केली आहे. असे रेड्डी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. आंदोलकांना सोडवण्यासाठी ड. विशाल साळवेंसहित अनेक वकील उपस्थित होते. ऋषिकेश रेड्डी यांनी समाज बांधवांना शांततेचे आवाहन करून आनंद लोंढे व कार्यकर्त्यांना सोडू असे आश्र्वासन देऊन आंदोलन मागे घेण्यास सांगितले. अखेर शिष्टमंडळाच्या आवाहनानंतर कार्यकर्ते घरी रवाना झाले. विनोद वाईन शॉपच्या विषयावर २३ जानेवारी रोजी जिल्हाधिकारींकडे बैठक होणार असल्याचे समजते.

# बंदुकीचा धाक दाखवून धुळ्यातील व्यापाऱ्यांना लुटले

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मुंबई आग्रा महामार्गावरील लळींग घाटामध्ये धुळे शहरातील दोघा व्यापाऱ्यांची अज्ञात पाच लुटारुंनी बंदुकीचा धाक दाखवत, पैशांची लूट केली असल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तसेच या दोघा व्यापाऱ्यांना लुटारूंनी मारहाण देखील केल्याचे उघडकीस आले आहे. पोलीस या प्रकरणी तपास करत आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, धुळे शहरातील दोन भंगार व्यापारी मालेगाव येथून व्यापाराचे पैसे वसुली करून रात्री उशिरा धुळ्याच्या दिशेने परतत होते. यावेळी मुंबई आग्रा महामार्गावरील



लळींग घाटात या दोघा व्यापाऱ्यांना दोन दुचाकी वरून आलेल्या पाच लुटारूंनी अडवले. तसेच बंदुकीचा धाक दाखवून जबर मारहाण केली. यावेळी लुटारुंनी व्यापाऱ्यांकडे असलेल्या बॅगेतील जवळपास अंदाजे तीन लाख रुपये लुटून घटनास्थळावरून पोबारा केला केला. या मारहाणीत जखमी झालेल्या दोघा व्यापाऱ्यांना शासकीय रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# लाचखोर पोलीस उपनिरीक्षकासह हवालदार जाळ्यात

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मोटार वाहतुकीचा गुन्हा दाखल न करता ट्रॅक्टर सोडुन देण्यासाठी पाच हजार रूपये लाचेची मागणी करणारे देवपूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोउनि हरिश्चंद्र पाटील याचेसह पोह रविंद्र मोराणीस यास धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ ताब्यात घेतले आहे.

तक्रारदार हे दि.१५ जानेवारी रोजी त्यांचे ऊसाने भरलेले ट्रॅक्टर चालकासह चोपडा तालुक्यातील सत्रासेन येथुन शिरपूर-धुळे मार्गे रावळगाव साखर कारखाना येथे जात होते. दरम्यान, धुळे शहरातील महामार्गावरील उड्डाणपुलावर ट्रॅक्टरला अपघात होवून ट्रॅक्टर पलटी झाला. या अपघात संदर्भात दि.१६ जानेवारी रोजी देवपूर पोलीस ठाण्याचे पोउनि हरिश्चंद्र पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे मोटार वाहतुकीचा गुन्हा दाखल न करता ट्रॅक्टर सोडून देण्यासाठी पाच हजार रूपयांची लाच मागितली. तक्रारदार यांनी



दि.१७ जानेवारी रोजी धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून घडला वृत्तांत कथन केला. सदरची कारवाई नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी, नरेंद्र पवार उप अधिक्षक अभिषेक पाटील, पोनि रूपाली खांडवी,हेमंत बेंडाळे, पोनि मंजितसिंग चव्हाण, राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, मकरंद पाटील, प्रविण मोरे, प्रशांत बागुल, रामदास बारेला, प्रविण पाटील, सुधीर मोरे, जगदीश बडगुजर या पथकाने केली.

# नाशिक-मुंबई महामार्गावर सशस्त्र दरोडा

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

नाशिक-मुंबई महामार्गावर सशस्त्र दरोड्याचा प्रकार घडला आहे. डोळ्यात मिरचीची पूड टाकून तब्बल तीन कोटींचा ऐवज दरोडेखोरांनी लुटल्याची माहिती मिळत आहे. गुरुवारी पहाटे ही घटना घडली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक- मुंबई महामार्गावरून गुरुवारी पहाटे सोनं आणि चांदीचे दागिने घेऊन जाणारी एक कुरिअर सर्व्हिसची इको जात होती. यावेळी ४ ते ५ अज्ञात व्यक्तींनी फिल्मी स्टाईलने माणिकखांब जवळ गाडीच्या पुढे आणि मागे गाडी आडवी लावली. त्यानंतर गाडीतील व्यक्तींना शस्त्राचा धाक दाखवला. यात ६६ लाख रुपये किमतीचे १ किलो १०० ग्राम वजनाचे ११ बिस्कीट, २० लाख ४० हजार रुपये किमतीचे ३ किलो ४०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ६५ लाख रुपयांचे प्रत्येकी ३० किलो वजनाच्या ३ चांदीच्या विटा, ३२ लाख ५० हजार रुपयांचे ४५ किलो वजनाचे चांदीचे दागिने असा एकूण ३ कोटी ६७ लाख ५० हजार रुपये किमतीचे ऐवज दरोडेखोरांनी लंपास केला आहे. माणिकखांब ते मुंडेगाव दरम्यान ही घटना घडली आहे. या प्रकरणी घोटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पत्रकार संघातर्फे राजेंद्र सोनार, जीवन शेंडगे, रोहित चांदोडे यांचा सत्कार

### बीएसएनएलच्या दूरसंचार सल्लागार समितीवर निवड

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



भारत सरकार संचार मंत्रालयातर्फे बीएसएनएलच्या दूरसंचार सल्लागार समितीवर सदस्य म्हणून ख्यातनाम व्यंगचित्रकार, दैनिक व्यंगनगरीचे संपादक, उत्तम प्रेस फोटोग्राफर, विविध कलांचे उपासक जेष्ठ पत्रकार राजेंद्र सोनार, जुने, जाणकार प्रेस फोटोग्राफर, दैनिक देशोन्नतीचे पत्रकार जीवन शेंडगे, भाजपा जनता युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. रोहित चांदोडे यांची अभिनंदनीय निवड करण्यात आली.

यानिमित्त निवड झालेले राजेंद्र सोनार, जीवन शेंडगे, रोहित चांदोडे यांचा धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार भवनात शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष जेष्ठ पत्रकार रवींद्र इंगळे, नवनिर्वाचित अध्यक्ष अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, सचिव सचिन बागुल, कोषाध्यक्ष तुषार बाफना, प्रांतिक प्रतिनिधी प्रकाश शिरसाठ, कार्यकारिणी सदस्य प्रा. मोहन मोरे, पुरुषोत्तम पाटील, राकेश गाळणकर, पंकज पाटील, आकाश सोनवणे, दीपक शिंदे, अजिंक्य देवरे उपस्थित होते.

# राज्यात कुणबीच्या ५४ लाख नोंदी आढळल्या, तत्काळ प्रमाणपत्र देण्याचे आदेश

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मनोज जरांगे पाटील यांच्या प्रस्तावित मुंबई मोर्चामुळे राज्य सरकारची प्रचंड धावाधाव सुरू आहे. जरांगेंचा मोर्चा अवघ्या २ दिवसांवर आला असताना आता राज्याच्या मुख्य सचिवांनी सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना कुणबी नोंदी सापडलेल्या सर्वच नागरिकांना तातडीने कुणबी प्रमाणपत्र जारी करण्याचे आदेश दिलेत. शिंदे




समितीला राज्यात ५४ लाख कुणबी नोंदी सापडल्यात हे विशेष.

मनोज जरांगे यांनी महाराष्ट्रातील समस्त मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळेपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा पुनरुच्चार केला आहे. तसेच आपल्या मुंबई मोर्चावर ठाम असल्याचेही स्पष्ट केले आहे. यामुळे सरकारवरील दबाव वाढला आहे. या पार्श्र्वभूमीवर मुख्य सचिवांनी सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना नोंदी सापडलेल्या सर्वच नागरिकांना तत्काळ कुणबी प्रमाणपत्र जारी करण्याचे आदेश दिलेत. विशेष म्हणजे हे प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष शिबीर आयोजित करण्याचे आदेशही त्यांनी दिलेत.

# अग्रवाल विद्यार्थी शिक्षण मंडळातर्फे कृत्रिम अवयव वाटप

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

कृत्रिम अवयव प्राप्त झाल्यानंतर एक नवा जन्म मिळाल्याची भावना दिव्यांगांच्या मनात निर्माण होते. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमलते. दिव्यांगांच्या चेहऱ्यावरील हे हास्यच आमच्यासाठी मोठा आनंद व समाधान देणारे आहे अशा भावना मान्यवरांनी दिव्यांगांना कृत्रिम वाटप अवयव वाटप कार्यक्रमात व्यक्त केल्या. या कार्यक्रमात २७० दिव्यांगांना कृत्रिम अवयव वाटप करण्यात आले.



अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळ, धुळे यांच्यातर्फे उदयपूर येथील नारायण लिम्ब व कॅलिपर्स फिटमेंट शिबिर गुरुवारी दिनांक १८ जानेवारी रोजी धुळे शहरातील अग्रवाल विश्राम भवन येथे झाले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उद्योगपती महेश मित्तल, नाशिक, ताराचंद गुप्ता, विनोद मित्तल, अनुप ओमप्रकाश अग्रवाल, अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष ओमप्रकाश अग्रवाल, सचिव दिनेश गिंदोडीया, खजिनदार पीयूष अग्रवाल, व्यवस्थापक विक्रम केडीया, नारायण सेवा संस्थानचे हरिप्रसाद लढ्ढा, अग्रवाल समाजाचे अध्यक्ष जगदीश गिंदोडीया, श्रीमती भारती आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. राजेश गिंदोडीया यांनी सूत्रसंचालन केले.

# सरकारचे शिष्टमंडळ जरांगेंच्या भेटीला: तुम्ही कोणतेही नाटकं लावू नका, जमत नसेल तर उठून जा

### जरांगे पाटलांचा शिष्टमंडळाला इशारा

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे २० जानेवारीपासून मराठा आरक्षणासाठी मुंबईकडे रवाना होणार आहे. लाखोंच्या संख्येने समाजबांधव या आंदोलनात सहभागी होणार आहे. त्यामुळे सरकारकडून जरांगे यांनी मुंबईकडे जाणाऱ्या मोर्चाला थांबवावे, अशी विनंती केली जात आहे. तुमच्या मागण्या सरकार पूर्ण करत आहे, असे आश्र्वासन शिष्टमंडळाकडून दिले जात आहे. परंतु जरांगे हे त्यांच्या भूमिकेवर ठाम आहेत. त्यामुळे सरकारचं शिष्टमंडळ पुन्हा जरांगे यांची मनधरणी करण्यासाठी व त्यांच्या मागण्यावर चर्चा करण्यासाठी आंतरवाली सराटीत दाखल झाले आहे.

यावेळी मनोज जरांगे यांनी शिष्टमंडळाकडे सरकारविषयी नाराजी व्यक्त केली. सरकारच्या वतीने कोणतेही नाटकं केली जाऊ नये, मराठा समाजाची फसवणूक करू नये, ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत. त्यांना तात्काळ प्रमाणपत्र द्या, अशी मागणी जरांगे यांनी केली. जर ते जमत नसेल तर तुम्ही या पवित्र व्यासपिठावरून निघून जा, असा इशारा जरांगे यांनी शिष्टमंडळाला दिला आहे.

या शिष्टमंडळात आमदार बच्चू कडू व मुख्यमंत्र्यांचे विश्र्वासू मंगेश चिवटे यांचा समावेश होता. ५४ लाख लोकांना कुणबी दाखला द्या, मी जानेवारी पूर्ण होईपर्यंत शांत राहतो, मान्य आहे का? असे जरांगे म्हणाले. ५४ लाख नोंदीची जबाबदारी प्रशासनावर दिली जावी. शाळेचा, देवीचा रेकॉर्ड या सर्व गोष्टीचा उल्लेख आहे. प्रमाणपत्र द्या म्हणून मी २३ डिसेंबर रोजीच सांगितले होते. मग आजच कसे प्रशासन जागे झाले आहे.

**तर मराठे अजिबात मागे हटणार नाहीत**



**जरांगे म्हणाले की, बरी आपली समाजाची बाजू सेफ आहे. आम्ही मुंबईत आलो तर मराठे अजिबात हटणार नाही. पहिल्या सारखे मराठे राहिले नाही. माझ्यावर ट्रॅप लावले जात आहेत. सरकार अजिबात सकारात्मक नाही. या ठिकाणी मराठा म्हणून भांडायचे अजिबात नाटकं करू नका, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.**

**२० तारखेच्या आत प्रमाणपत्र द्या**

**''सरकारकडे ज्या ५४ लाख कुणबी नोंदी सापडलेल्या आहेत, त्या आधारावरुन मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावं. २० तारखेला किती प्रमाणपत्र वाटप केले, त्याचा आकडा जाहीर करावा. त्यानंतरच मग नातेवाईकांच्या आरक्षणाचं बघू. आधीच त्याच्यावर वेळ घालवण्यचं कारस्थान सुरु आहे.'' असा आरोप जरांगेंनी केला.**

# सिन्नर तालुक्यात बिबट्या जेरबंद

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

शहरासह जिल्ह्यात बिबट्याचे दर्शन होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. सिन्नर तालुक्यातील माळेगाव परिसरात बिबट्या मादी आणि पिल्लांची ताटातूट झाली होती. त्यानंतर वनविभागाने या माय-लेकाची भेट घडवून आणली. या भेटीचे दृश्य कॅमेऱ्यात कैद करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकच्या सिन्नर तालुक्यातील माळेगावमध्ये राहणाऱ्या नामदेव रामचंद्र काकड यांच्या शेतात बुधवारी सकाळी ऊसतोडणीचे काम चालू असतानाच बिबट्याचे तीन पिल्ले आढळून आले होते. याच परिसरात बिबट्याची मादी देखील असल्याच्या शक्यतेवरून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. देवळाली कॅम्प परिसरात मोठ्या प्रमाणावर झाडे असल्याने बिबट्यांना लपण्यासाठी चांगली जागा आहे. सध्या नाणेगाव व विजयनगर भागातील ऊसतोड सुरू असल्याने बिबट्याने आपला मोर्चा लगतच्या स्टेशन वाडी परिसरात हलवल्याचे दिसून येते. येथील नाल्यावर तीन बिबटे एकत्रित फिरत असल्याचे नागरिकांना निदर्शनास आले.

# आंध्रात कन्येवर मदार

राजकारणात नाती-गोती दुय्यम असतात याचे प्रत्यंतर महाराष्ट्रासह देशात वारंवार आले आहे. आंध्र प्रदेशात शर्मिला व जगन मोहन या भावंडांत सख्य नाही. त्याचा फायदा घेण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे.

आंध्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदी वाय एस शर्मिला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जी आर राजू यांनी प्रदेश अध्यक्षपदाचा राजीनामा दिला तेव्हाच शर्मिला यांना हे पद मिळणार असा अंदाज व्यक्त झाला होता, काही तासातच तो खरा ठरला. आंध्र प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री व दिवंगत ज्येष्ठ नेते वाय एस राजशेखर रेड्डी यांच्या शर्मिला कन्या आहेत आणि विद्यमान मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्या भगिनी आहेत. त्यांनी गेल्या वर्षी तेलंगणातील विधानसभा निवडणुकीपूर्वी वाय एस तेलंगण हा पक्ष स्थापन केला होता व काँग्रेसला पाठिंबा दिला होता. अलीकडेच त्यांनी आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला. पक्षात प्रवेश केल्यानंतर एखाद्या व्यक्तीस एवढ्या कमी अवधीत महत्त्वाचे पद मिळण्याची अशी घटना काँग्रेसच्या बाबतीत दुर्मिळच म्हटली पाहिजे; पण सध्याचा काळ वेगळा आहे. काँग्रेसचे समर्थक कमी होत असताना जेथून मिळेल तेथून पाठिंबा घेणे पक्षाला गरजेचे आहे. दक्षिणेत पाय रोवण्याची संधी भारतीय जनता पक्ष शोधत आहे. त्याच हेतूने पंतप्रधान नरेंद्र मोदी आंध्र प्रदेशात आले असतानाच शर्मिला यांच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्तीची घोषणा झाली हेही महत्त्वाचे आहे. त्यांच्या नियुक्तीने आंध्रात भाऊ विरुद्ध बहीण असा राजकीय सामना रंगणार आहे. त्याचा निकाल पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

पूर्वीच्या एकत्रित आंध्र प्रदेशात काँग्रेसचा दबदबा मोठा होता. अनेक नेत्यांच्या मालिकेत वाय एस राजशेखर रेड्डी हे एक होते. त्यांचे २००९ मध्ये अपघाती निधन झाले. त्या नंतर आपल्याला मुख्यमंत्री पद द्यावे अशी मागणी जगनमोहन यांनी केली, पण काँग्रेसने त्याकडे दुर्लक्ष केले. नंतर काँग्रेसने सत्ता गमावली. तेलुगु देशम पक्ष सत्तेत होता. पण जगन मोहन यांनी गेल्या निवडणुकीत १७५ पैकी १५१ जागा जिंकून दणदणीत विजय संपादन केला. त्या विजयात शर्मिला यांची कामगिरी मोलाची असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. त्या वेळी त्यांनी मोठ्या प्रचार यात्रा काढल्या होत्या. नंतर जगनमोहन यांच्याशी त्यांचे का व कशावरून बिनसले हे नेमके स्पष्ट झाले नाही; पण राजकारणात त्याला महत्त्व नसते. आपल्याला आज कोण साथ देत आहे हा मुद्दा महत्त्वाचा असतो. आंध्राचे विभाजन काँग्रेसने केले पण त्यांना दोन्ही राज्यांत सत्ता मिळाली नाही. आता मोठ्या मुश्किलीने तेलंगणात काँग्रेस सत्तेत आला आहे. येत्या मे महिन्यापूर्वी आंध्र प्रदेशात निवडणूक होत आहे. शर्मिला यांच्या नियुक्तीस लोकसभा निवडणुकीचीही पार्श्वभूमी आहे. उत्तरेतील हिंदी भाषक राज्यांत काँग्रेसला नुकतेच मोठे अपयश आले. लोकसभेसाठी जागांची कमतरता भरून काढण्यासाठी काँग्रेसची मदार दक्षिणेवर आहे. भाजपही याच विचाराने दक्षिणेत प्रयत्न करत आहे. मोदी यांनी भ्रष्टाचारावर भाष्य केले; पण जगनमोहन यांच्यावर टीका केली नाही हे लक्षणीय आहे. कर्नाटक व तेलंगणात काँग्रेसचे सरकार स्थापन झाले आहे. तामिळनाडूत द्रमुक मित्र पक्ष असला तरी काँग्रेसला दुय्यम स्थान आहे. केरळमध्ये पक्षाची स्थिती फार बळकट नाही. त्यामुळे आंध्र प्रदेशात मोठा विजय मिळवणे त्यांच्यासाठी आवश्यक आहे. राजशेखर रेड्डी यांच्या निधनानंतर त्यांच्याकडे समर्थ नेता तर सोडाच; पण या राज्यात चांगला चेहेराही नाही. शर्मिला यांच्या रूपाने त्यांना तो मिळाला आहे. त्या राजशेखर रेड्डी यांच्या कन्या असल्याने काँग्रेसच्या परंपरागत मतदारांना भावनिक आवाहन करणे सोपे जाईल. शर्मिला यांना निवडणूक लढवण्याचा, प्रचाराचा चांगला अनुभव आहे.काँग्रेसच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना त्या पुन्हा एकत्र करू शकतील, पक्षातून बाहेर पडलेल्यांना तसेच जगनमोहन यांच्याही पक्षातील काही नेत्यांना त्या काँग्रेसकडे वळवतील अशी पक्षाला आशा आहे. जगन मोहन यांच्या पक्षाला खिंडार पाडल्याखेरीज मोठा मतदार वर्ग खेचणे काँग्रेससाठी अवघड आहे. 'इंडिया' आघाडीतील घटक पक्ष येथे कितपत साथ देतील याचा अंदाज नसल्यामुळे त्यांना स्वबळावर लढावे लागत आहे. म्हणूनच त्यांची मदार शर्मिला यांच्यावर आहे. खेळी किती यशस्वी होते ते लवकरच दिसेल.

# चिरकाल निनादत राहील अशी 'आसक्त कलामंच'ची ''घंटा (लेमन्स)

कलात्मक दिग्दर्शक म्हणून कार्यरत असलेले प्रसिद्ध सिने नाट्य दिग्दर्शक मोहित टाकळकर यांनी २००३ साली 'आसक्त कलामंच' ची स्थापना करून आतापर्यंत ३० पेक्षा जास्त नाटकांची निर्मिती केली आहे. संपूर्ण भारतभर त्यांची नाटके सादर होत असतात. 'आसक्त कलामंच'ची नाटके विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सवात सादर झालेली आहेत. मोहित टाकळकर हे प्रशिक्षित शेफ असून गेली १८ वर्ष सातत्याने सिने-नाट्य निर्मितीच्या आणि दिग्दर्शनाच्या विविध पैलूंवर काम करीत त्यांनी 'आसक्त' ची एक वेगळी ओळख आणि प्रतिष्ठा निर्माण केली आहे. 'आसक्त कलामंच' निर्मीत 'घंटा' (लेमन्स) या प्रायोगिक नाटकाचा नाशिक येथील महाकवी कालिदास कलामंदिरच्या रंगमंचावर आज शुक्रवार दि. १९ रोजी सायंकाळी ६:३० ला नाट्य प्रयोग होतो आहे. आघाडीचे अभिनेता ललित प्रभाकर आणि अभिनेत्री मल्लिका सिंग हंसपाल या दोघांनी समर्थपणे या नाटकातील मुख्य भूमिका साकारल्या आहेत. खरं तर नाट्य रसिकांसाठी ही नाट्य पर्वणीच आहे. नाशिककर रसिक या अपुर्व संधीचा निश्र्चितच लाभ घेतील.

प्रसिद्ध नाटककार सॅम स्टायनर यांच्या मूळ इंग्रजी भाषेतील लेमन्स, लेमन्स, लेमन्स, लेमन्स, लेमन्स... या गाजलेल्या नाटकाचे प्रसिद्ध नाटककार तथा दिग्दर्शक निरंजन पेडणेकर यांनी मराठीत रुपांतर केले आहे. निरंजन पेडणेकर हे टीसीएस रिसर्च चे मुख्य शास्त्रज्ञ, प्रतिष्ठित अभियंता असून ते प्रसिद्ध नाटककार आणि दिग्दर्शक म्हणून नावारूपास आले आहेत. त्यांनी आतापर्यंत १९ नाटके लिहिली, रूपांतरित केली. आणि अनुवादित केली आहेत. देशभरातून निवडलेल्या पाच नाट्य कलाकारांना दरवर्षी देण्यात येणार्या प्रतिष्ठेच्या तेंडुलकर-दुबे फेलोशिपने ते सन्मानित झालेले आहेत. 'उच्छाद' या यास्मिना रेझा यांच्या 'गॉड ऑफ कार्नेज'च्या त्यांच्या मराठी अनुवादाने नुकताच २०२३ च्या सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटकाचा झी गौरव पुरस्कार सुद्धा जिंकला आहे. समृद्ध आणि अनुभवी लेखकाच्या हातून सर्व स्तरावर दखल घेतली जावी असे नाटक लिहिले गेले आणि प्रायोगिक नाट्य निर्मितीचा ध्यास असलेल्या कलात्मक दिग्दर्शक मोहित टाकळकर सारख्या दिग्दर्शकाने नाटक दिग्दर्शित करावं ही नाटकाच्या यशासाठी जमेची बाजू म्हणता येईल. घंटा, घंटा, घंटा, घंटा, घंटा...हे मराठी नाटक निर्माता आशिष



दिग्दर्शक मोहित टाकळकर

मेहता यांनी 'आसक्त कलामंच'च्या माध्यमातून कलासक्त रसिकांसाठी प्रायोगिक नाट्यनिर्मीती म्हणून रंगभूमीवर आणले आहे. सध्या 'घंटा' चे महाराष्ट्रभर प्रयोग होत असून हे प्रायोगिक नाटक रसिकांच्या पसंतीत प्रथमस्थानी पोहोचले आहे..

**कथानक** - एक कल्पित आणि वास्तवतेकडे नेणारं नाटक म्हणजे 'घंटा'. फिरोजा (मल्लिका सिंह हंसपाल) आणि आदित्य (ललित प्रभाकर) हे जोडपे फॅसिस्ट राजवटीच्या देशात जीवनाचा अर्थ, प्रेम आणि राजकारण उलगडण्याच्या शोधात निघतात. देशात आलेल्या कठोर कायद्याने दैनंदिन शब्दांचा वापर १४० पर्यंत मर्यादित होतो आणि त्याने त्यांच्या नाते संबंधात काय ताणतणाव येतात त्याबद्दल नाटकाच्या कथानकातून एक विखंडित गोष्ट सांगतली जाते. फिरोजा ही एक सरकारी वकील आणि आदित्य हा एक संगीत कलाकार. असे हे दोघे कायद्याच्या भीती आणि चिंतेने संवाद साधण्यासाठी धडपडत असतात आणि पडताळू पाहत आहेत की ते या अराजकतेवर मात करू शकतील का? या नाटकात स्त्री आणि पुरुष यांच्यातील प्रेमाच्या राजकारणाचा शोध घेतला जातो. आंदोलनकर्ता आणि सरकारी प्रतिनिधी यांना एकमेकांसमोर उभे करते. आणि उपेक्षितांच्या संघर्षातील प्रस्थापितांच्या भूमिकेला आव्हान देते. सर्वांवर थोपवला गेलेला कायदा समाजाला एकत्रितपणे आणि व्यक्तिगत एका मनावर अशा दोन्ही पातळीवर परिणाम करतो ज्यातून वैयक्तिक हेच राजकीय आहे



याचा अर्थ नक्की काय हे शोधायचा नाटक प्रयत्न करते. आदित्य आणि फिरोजा यांच्या सदोष व कार्यक्षम नात्यातून हे नाटक समकालीन काळातील खंडित वास्तव प्रतिबंधित करते. ललित प्रभाकर आणि मल्लीका सिंग हंसपाल या दोघा कलावंतांनी आपापल्या भूमिका समर्थपणे साकारल्या असून नाटक समृद्ध करण्यासाठी तसूभरही कमी पडले नाहीत. रंगमंचावरील त्यांच्या अभिनयाची श्रीमंती वाखाणण्यासारखी आहे.

**समृद्ध कलात्मक दिग्दर्शक** - कलात्मक दिग्दर्शक म्हणून ज्यांचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नेहमीच डंका वाजत राहतो असे 'आसक्त कलामंच'चे संस्थापक मोहित टाकळकर यांची नाट्य क्षेत्रातील भरीव कार्याची श्रीमंती ही डोळे दिपवणारी आहे. मोहित टाकळकर हे प्रशिक्षित शेफ असून अठरा वर्षांपासून सातत्याने कलात्मक दिग्दर्शन आणि प्रायोगिक तसेच व्यावसायिक नाट्य निर्मितीच्या विविध पैलूंवर विविधांगी प्रयोग करीत त्यांच्या कार्यपद्धतीची स्वतंत्र ओळख त्यांनी निर्माण केली आहे. प्रत्येक नाटकांमधून त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या प्रयोगांना प्रेक्षक आणि समीक्षकांनी नेहमीच उत्स्फूर्त दाद दिली आहे. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सवात त्यांची नाटके सातत्याने आमंत्रित केली जातात. आतापर्यंत त्यांनी ३० पेक्षा जास्त नाटके दिग्दर्शित केली आहेत. गिरीश कर्नाड लिखित 'ययाती' हे त्यांनी दिग्दर्शित केलेलं तसं पहिलं नाटक. 'हुंकारो', 'चहेता', 'मै हु युसुफ और ये है मेरा भाई', 'ऋ-१/१०५', उणे पुणे शहर एक', 'मोसंबी नारंगी', 'कॉम्रेड कुंभकर्ण', 'गजब कहाणी', 'गार्बो' आणि 'तू' ही त्यांची काही गाजलेली नाटक आहेत. नाट्य दिग्दर्शनाबरोबर सिनेमा दिग्दर्शक आणि संकलक म्हणूनही त्यांची वेगळी ओळख आहे. त्याचा पहिला सिनेमा 'द ब्राईट डे' टोरंटो आंतरराष्ट्रीय महोत्सवात प्रदर्शित झाला होता. याशिवाय लंडन, न्यूयॉर्क आणि शांघाय आंतरराष्ट्रीय महोत्सवातसुद्धा हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. साहित्य अकादमी प्रस्तुत 'चिरेबंदी' ह्या प्रसिद्ध नाटककार एलकुंचवार यांच्या कामावरील माहितीपटाचे दिग्दर्शनही त्यांनी केलं आहे. गेल्या वर्षी चित्रपट गृहांमध्ये प्रदर्शित झालेला 'मिडीयम स्पायसी' हा सिनेमा नुकताच प्राईम व्हिडिओ या ओटीपी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला आहे. त्यांना आतापर्यंत उस्ताद बिस्मिल्ला खान युवा पुरस्कार, होमी भाभा फेलोशीप, शंकर नाग थिएटर अवॉर्ड, आदित्य विक्रम बिर्ला कलाकिरण पुरस्कार, अमरीश पुरी पुरस्कार, साहित्य रंगभूमी फेलोशिप, झी गौरव पुरस्कार, मामा वरेरकर पुरस्कार, महाराष्ट्र राज्य पुरस्काराने सन्मानित केले गेले आहे. चार्ल्स वॉलस शिष्यवृत्ती अंतर्गत प्रा. फिलिप झरेली यांच्या मार्गदर्शनाखाली एक्झिटर युनिव्हर्सिटी मधून त्यांनी नाट्यशास्त्राचं पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. अशा समृद्ध दिग्दर्शकांकडून दिग्दर्शित झालेली प्रायोगिक नाट्य निर्मितीची 'घंटा' चिरकाल निनादत राहो ही संपूर्ण टिमला शुभेच्छा!

**यशस्वी टीम**- आसक्त कलामंच निर्मित निर्माता- आशिष मेहता, प्रकाश योजना- विकास ठकार, संगीत दिग्दर्शन- सौरभ भालेराव, वेशभूषा- रश्मी रोडे मुख्यचित्र आणि सुलेखन- चंद्रमोहन कुलकर्णी, सहाय्यक दिग्दर्शन- सुयोग देशपांडे, महेश भामरे, ऋषिकेश पुजारी, निर्मिती व्यवस्थापन- स्वप्निल वारे, आदित्य संतोष, मंच व्यवस्था प्रमुख- हिमांशू बोरकर, रंगवस्तू निर्मिती- अमेय भालेराव, जाहिरात संकल्पना- तुषार ताजणे, मंचव्यवस्था- सुजन नीला हरिहर, मंगेश इंगोले, स्वराली पेंडसे, अरुंधती आगाशे, प्रकाश योजना सहाय्य- यश पतनीस, निर्मिती सहाय्य- ओम जगताप, शर्वरी हळदवणेकर, छायाचित्र- कुणाल शर्मा, विशाल मगर आणि निर्मितीसाठी विशेष सहकार्य- अनिता कुशवाह, अपूर्वा कुलकर्णी, आशिष देशपांडे, अतुल कुमार, जीवन मोरे, प्रदीप वैद्य, राजीव गुरुंग, शुक्रा राय गुरुंग, स्वराली पवार, कुलदीप सिंग शेखावत, द कंपनी थिएटर, द बेस पुणे, इन्फायनाईट, व्हेरिएबल, बॉक्स पुणे.



|| लोकरंग ||
दिलीप साळुंके
(नाशिक) मो.९४०४५७५१००

# स्वाभिमानी व महान योध्दा महाराणा प्रतापसिंह

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला.मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही.प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता.त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे.कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे. त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.

ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतः च्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले. जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले. त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ, राणा संग, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल.असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले. ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला. महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले.राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दु:खी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली.प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले. तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला. त्याचा पाय निकामी झाला.अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला.आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही. हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते. अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील.परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना पुण्यतिथी निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!



रमेश लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.९९२१६९०७७९

## शब्दकोडे-२९७



**आडवे शब्द** -
२. दक्षता ५. प्रश्नोत्तरांचे जुगलबंदी ९. उपेक्षित १०. महिना १२. शासन, शिक्षा १४. जाडसर दळलेला गहू १६. कस्तुरी देणारे हरीण १९. नजरबंदीचा खेळ करणारा २०. परंपरागत विचारसरणीचा २३. भांडण २४. गुंड २५. समुद्रकिनारा २९. प्राचीन ३०. दुधाचे पक्वान्न ३१. झाड ३३. उपकारांची जाणीव असलेला ३४. थट्टेखोर ३६. स्त्री ३९. बेलगाम, दावे ४१. रंग उडालेला ४२. काश्मीरचे प्रसिद्ध फळ ४५. सरावाने निष्णात ४८. जास्त ५०. नौका ५१. दया ५२. दरोडेखोर ५३. राग ५४. पुष्टी ५६. परंपरा ५८. समस्त ५९. गर्दी ६०. रागावलेला ६२. खळगा ६४. कोलकात्याचे जुने नाव ६६. नकारात्मक वृत्ती जोपासणारा ६८. बाग, अरण्य ६९. डाग ७१. विनोद (इंग्रजी) ७२. साय ७५. संकुचित वृत्तीचा ७७. हडकुळा ७८. बेळगाव सध्या या राज्यात आहे ७९. बळेच घोड्यावर चढवलेला

**उभे शब्द** -
१. अप्राय २. धोकादायक ३. विष्णूची पत्नी ४. भाजून काढणारे ६. मतभेद, वाद ७. माळ, सर ८. वाचाळ, बहुभाषी ११. पन्ह्याचे फळ १३. धरती १५. वायू १७. प्रशंसा १८. दोन्हीकडून बडवला जाणारा १९अ. फजिती २०. समंजस २१. व्यवस्थित २२. प्रेम २५. अमसुलाचे गरम पेय २६. युद्धभूमी २७. हा कोल्हापूरचा तांबडा-पांढरा प्रसिद्ध २८. शेवट ३०. अडथळा ३२. कोरडा ३५. पांथस्थ ३७. काटा ३८. रामदासांचा ग्रंथराज ३९. आनंद ४०. महिला ४१. प्राक्तन ४३. चीर, सापट ४४. चैन ४६. अकबराशी लढणारा स्वाभिमान राजपूत राजा ४७. भेग ४९. 'स्वामी' कादंबरीचे नायक ५१. कंबर ५४. दासी ५५. काळिमा ५७. ही शाबासकीची असेल तर चांगली! ६१. साहित्यिक ६१अ. लग्नात वाटला जाणारा ६२. प्रत्येक ६३. पुष्कळ ६५. ध्येय ६७. सारखा ६८. माता ७०. पिशाच्च ७१. 'रमी'तील महत्त्वाचे पान ७३. झुंजार ७४. स्तुतीपाठक ७६. तांदळाचा एक पदार्थ

## शब्दकोडे-२९६ चे उत्तर

आडवे उत्तर - १.विजेता ३.नगरसेवक ७.जबरदस्त १०.तजवीज ११.नरम १३.हाला १४.लबाडी १६.नराधम १९.तसदी २२.लता २५.डमडम २८.नानक ३०.अंदाजपत्रक ३३.तारकानाथ ३५.धनगर ३६.कानस ३७.पोळपाट ३९.करंगळी ४१.कावळा ४३.वहाण ४४.तवाना ४६.ससा ४७.तबकडी ४८.पर ४९.परत ५०.आबाळ ५१.पार ५२.खान ५३.शिवाजी ५५.आज ५७.तसनस ५८.आग ५९.वरवर ६१.मस्तवाल ६३.नीरस ६४.सनसनाटी ६६.खरवस ६८.पावा ७०.वादा ७१.दार ७२.अवयव ७३.कसर ७४.सरदार ७७.खरारा ७८.मावळण ७९.जरूर

उभे उत्तर - १.विशाल २.तातडी ३.नवीन ४.गजरा ५.वन ६.कर ८.रहा ९.दलाल १२.मत १५.बारदान १७.धड १८.ममता २०.सनाथ २१.दीन २३.टाटातूट २४.खापरपणजोबा २६.डरकाळी २७.मकान २९.कमळ ३०.अंधळा ३१.जग ३२.करकरीत ३४.नासका ३७.पोळा ३८.पारावार ४०.गडकरी ४२.वखार ४३.वसा ४४.तपन ४५.नातलग ४६.सदाशिव ४८.परसदार ५०.आजीवन ५१.पात ५२.खासनीस ५४.वारसदार ५५.आमटी ५६.जस्त ५८.आसपास ६०.रसदार ६२.वातावरण ६५.नार ६६.खवखव ६७.वनराज ६९.वारकरी ७०.वासरू ७३.कट्यार ७५.दासी ७६.पाव

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### आरंभ महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**नाशिक ।** नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या नाशिक रोड येथील पुरुषोत्तम इंग्लिश स्कूलच्या आरंभ महाविद्यालयात संस्थेचे सदस्य कै. मो. दा. पाटणकर स्मृतीप्रित्यर्थ जनकल्याण रक्तपेढीच्या सौजन्याने रक्तदान शिबिर झाले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे नाशिक रोड संकुलप्रमुख अलका कुलकर्णी, शाळा समितीचे अध्यक्ष रावसाहेब गायधनी, प्राचार्य उमाकांत वाकलकर, उपप्राचार्य संगीता पवार, अमित पाटणकर, अशोक बांगर, जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. गोविंद कुलकर्णी, प्रदीप देशमुख, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सुभाष ढोकणे, रक्तदान शिबिरप्रमुख भरत खंदारे आदी उपस्थित होते.

### कारने कट मारल्याने दुचाकीस्वार ठार

**नाशिक ।** अमृतधामकडून मिरची हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर कारने कट मारल्याने दुचाकी बरेकेटिंगवर जाऊन आदळली. यात दुचाकीवरील एकजण ठार तर दुसरा जखमी झाला आहे. ओबेद बाजीराव शेळके हा मयत झाला तर, यश दिलीप निकम जखमी आहे. निकम याच्या फिर्यादीनुसार, सोमवारी सदर अपघात घडला. याप्रकरणी अज्ञात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राष्ट्रवादी पार्टीचा झेंडा सर्वाधिक फडकवण्यासाठी महिलांनी प्रयत्न करावे





### मंत्री छगन भुजबळ यांचे आवाहन

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



ज्यावेळी आपण निर्धार करतो, तो कसा करावा यासाठी इतिहासात डोकावून पाहिलं पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविण्याचा निर्धार मां जिजाऊंनी केला होता. त्याचप्रमाणे झाशीची राणी, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, रमाबाई आंबेडकर, रखमाबाई राऊत यासारख्या महिलांनी निर्धार केला. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून महिलांनी वाटचाल करायला हवी. पक्ष अधिक बळकट करण्यासाठी सर्व समाज बांधवाना सोबत घेऊन महिलां संघटन अधिक मजबूत करून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा झेंडा सर्वाधिक कसा फडकेल यासाठी महिलांनी प्रयत्न करावे. असे आवाहन राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

मुंबईत काल षण्मुखानंद सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी महिला काँग्रेस आयोजित भव्य नारीशक्ती निर्धार मेळावा पार पडला. मंत्री छगन भुजबळ यांनी उपस्थित महिला भगिनींना संबोधित केले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मंत्री धर्मराज बाबा आत्राम, मंत्री अनिल पाटील, मंत्री अदिती तटकरे, मुंबई अध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ, आ. नितीन पवार, मनोहर चंद्रिकापुरे, उमेश पाटील, महिला पदाधिकारी राजलक्ष्मी भोसले, सुरेखा ठाकरे, आभा पांडे यांच्यासह पदाधिकारी व राज्यभरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिला आयोगाच्या अध्यक्षा तथा महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, नुकत्याच झालेल्या निवडणुकीत आपण कुठे आहोत हे आपल्याला बघायला मिळालं आहे. भाजपनंतर आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अतिशय बळकट आणि राज्यातील नागरिकांचा विश्वास आहे. त्यामुळे पक्षातील संघटन अधिक मजबूत करण्यासाठी महिलांनी सर्व स्थरातील महिलांचे प्रश्न समजून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करावे. गावपातळीवर शहरात वार्ड पातळीवर पक्ष अधिक बळकट करावा.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तुमच्या सोबत आहे. असा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण करावा असे आवाहन त्यांनी केले. ते म्हणाले की, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लवकरच लोकसभेत देखील महिलांना आरक्षण मिळणार आहे. परंतु पहिली परिक्षा ही ग्रामपंचायत, नगरपालिका, महापालिका, जिल्हा परिषद ही आहे. ही परिक्षा पास झाल्यावर आमदार आणि खासदार येथेही आपल्याला मोठी संधी उपलब्ध होईल असे त्यांनी सांगितले.

# सेवाव्रती किसनराव भोई यांचे कार्य चिरकाल स्मरणात राहील



### हभप कैलास महाराज वेलजाळी यांचे प्रतिपादन

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेऊन प्रतिकूलतेशी संघर्ष करत किसनराव (दादा) भोई-पाटील यांनी आपल्या निष्काम कार्याचा सर्वच क्षेत्रात ठसा उमटविला. पूज्य दादांनी केलेले सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक कार्य सर्वांच्या चिरकाल स्मरणात राहील. असे प्रतिपादन राज्यस्तरीय पुरस्कार विजेते हभप कैलास महाराज वेलजाळी यांनी केले.

नाशिक येथील सेवाव्रती व्यक्तिमत्व, अनेकांचे मार्गदर्शक किसनराव भोई-पाटील यांचा प्रथम पुण्यस्मरण सोहळा ओमनगर, नाशिक येथील वालझाडे मंगल कार्यालयात संपन्न झाला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना हभप कैलास महाराज वेलजाळी महाराज बोलत होते. ते पुढे बोलतांना म्हणाले की, मनुष्य जन्माचे सार्थक करायचे असेल तर आपण समाजाचे काही देणे लागतो हा विचार ध्यानी-मनी ठेऊन कुठल्याही फळाची अपेक्षा न करता निष्काम भावनेने समाजसेवा करणे आवश्यक आहे. हीच निष्काम सेवा किसनराव भोई-पाटील यांनी केली. भरीव सामाजिक कार्यामुळे ईश्वरतुल्य व्यक्तिमत्व म्हणून दादांची ओळख निर्माण झाली. खचलेल्या व्यक्तीला प्रचंड हिंमत देऊन प्रगतीचा मार्ग दिला. वाचन संकृतीला त्यांनी बळ दिले, आरोग्यासाठी व्यायाम करण्यास अनेकांना प्रेरणा त्यांनी दिली असेही कैलास महाराज वेलजाळी यांनी सांगितले.

पुण्यतिथी सोहळ्यास जगदगुरू जनार्दन स्वामी महाराज आश्रमाचे ब्रम्हचारी मारुतीनंद महाराज, ब्रम्हचारी राजू बाबा, पंचमुखी मंदिराचे मुख्यपुजारी भक्तीदास महाराज, माजी आमदार बाळासाहेब सानप यांच्यासह राजकीय, सामाजिक, पत्रकार, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपास्थित होते. उपस्थितांचे स्वागत शशिकांत भोई-पाटील, रवींद्र भोई-पाटील, नाशिक एक्सप्रेस समूहाचे संपादक योगेश भोई-पाटील, मंगेश भोई-पाटील यांनी केले.

# सार्वजनिक वाचनालयातर्फे आजपासून ग्रंथालय सप्ताहाचे आयोजन

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



वाचकांना उत्तमोत्तम साहित्यिकांची गाठभेट घालून देणारा श्रवणीय कार्यक्रम म्हणजे सावानाचा ग्रंथालय सप्ताह. सावानाच्या या वैशिष्ट्यपूर्ण सोहळ्याचा शुभारंभ ख्यातकीर्त कवी,अभिनेते सौन्मीत्र उर्फ किशोर कदम ह्यांच्या व्याख्यानाने दि. १९ जानेवारीपासून होत आहे. त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे कविता, नाटक आणि जगणं. (कै. अन्नपूर्णाबाईं डोळे स्मृती व्याख्यान) या वेळी (उत्कृष्ट महिला वाचक, पुरुषवाचक, बालवाचक पुरस्कार) देण्यात येणार आहेत.

शनिवार दि.२० जानेवारी सायं ६ वाजता. वक्ते- सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ अतुल पाटील, विषय:उपवास आणि उपासना (आरोग्यदायी आयुष्याचा राजमार्ग) या विषयावर व्याख्यान.

रविवार २१ जानेवारी सायं ६ वाजता. डॉ.गिरीश जाखोटिया मुंबई - आंतरराष्ट्रीय अर्थकारणावरचे भाष्यकार व 'एलेपोळली ष डीर्ीोंर्ीरश्र' आणि 'कृष्णनीती' या ग्रंथांचे लेखक. विषय - जागतिक अनिश्चितता आणि भारत (कै.सावित्रीबाई वावीकर स्मृति व्याख्यान) आदिवासी कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या सेवाभावी कार्यकर्त्यांचा सन्मान) करण्यात येणार आहे.

सोमवार दि.२२ जानेवारी सायं ६ वाजता. वक्ते: लेखक अभिनेते अशोक समेळ (मी अश्वत्थामा... चिरंजीव हया कादंबऱ्या चे लेखक) विषय:- महाभारत ते ज्ञानेश्वरी यावर भाष्य करणार आहेत.

मंगळवार २३ जानेवारी सायं ६ वाजता. श्री.संदेश भंडारे, तमाशा आणि वारी या परंपरेचे डॉक्युमेंटेश करणारे संदेश भंडारे यांच्याशी संवाद आणि छायाचित्रांचा स्लाइड शो सह संवाद साधणार आहेत.

बुधवार दि. २४ जानेवारी सायं ६ वाजता श्री विश्वास पाटील (पानिपतकार) विषय: मी आणि माझ्या कादंबऱ्या ( बी. लिब.व एम लिब् अभ्यासक्रमात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास कै. मु. शं.औरंगाबादकर स्मृती पुरस्कार.) देण्यात येणार आहे.

गुरुवार दि.२५ जानेवारी सायं ६ वाजता. डॉ वंदना बोकील कुलकर्णी विषय :-श्यामची आई आजच्या काळात प्रस्तुतता ( बी.ए./ एम.ए.मराठी विषयात सर्व प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास कै भावनाताई भार्गवे कै. अलकनंदा आकूत स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

एक व्याख्यान ऐकणे म्हणजे दहा पुस्तके वाचणे. म्हणूनच वाचकांनी या ग्रंथालय सप्ताहात सर्व दिवस आपला सहभाग द्यावा व वेगवेगळ्या वक्तृत्वांचा आनंद घ्यावा असे आवाहन सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रम स्व. मु. शं. औरंगाबादकर सभागृह, सावाना आवार, टिळक पथ, नाशिक येथे होणार आहेत.

# कर्मवीर शांतारामबापू वावरे महाविद्यालयात भूगोल महोत्सवाचे उद्घाटन

**नविन नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मराठा विद्या प्रसारक समाजाचे, कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय सिडको, नाशिक येथे भूगोल विभाग व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष आयोजित भूगोल महोत्सव २०२४ उद्घाटन व भूगोल दिनाच्या निमित्ताने विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सोपान कुशारे होते, प्रमुख पाहुणे व व्याख्याते भूगोल अभ्यास मंडळ सदस्य डॉ. राजेंद्र गुंजाळ उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक सकाळ सत्र प्रमुख प्रा. एस. आर. निकम यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन डॉ. डी. एन. पवार यांनी केले. प्रमुख व्याख्याते यांनी भूगोल दिनाच्या संदर्भातील माहिती, भूगोल विषयातील करिअर, संधी, भूगोल विषयाचे उपयोजन त्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्य कुशारे यांनी अध्यक्षीय मनोगतात भूगोलातील विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीतील भूगोल विषयाचे योगदान याबद्दल मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन पी.व्ही. सोनवणे यांनी केले. याप्रसंगी प्रा. वाय. ए. करंजकर, डॉ. विठ्ठल अनवट, प्रा. शुभम गव्हाणे, प्रा. निरंजन पवार उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने भूगोल महोत्सव हा १४ जानेवारी भूगोल दिनानिमित्ताने दि.२० जानेवारीपर्यंत आयोजित केलेला असून या अंतर्गत राष्ट्रीय ई- पोस्टर स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, हस्तलिखित लेख स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत. तर मुख्य थीम शाश्वत विकास आहे. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# युवक मित्र मंडळ दिनदर्शिकेचे प्रकाशन



### १७ वर्षापासून उपक्रम सुरु ; १० हजार नागरिकांना होणार मोफत वाटप

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

युवक मित्र मंडळाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमाचे स्वामी माधवगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.१७ वर्षापासून हा उपक्रम सुरु असून, परिसरातील १० हजारांहून अधिक नागरिकांना मोफत वाटप करण्यात येणार आहे.

राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रम,तपोवन येथे झालेल्या कार्यक्रमास भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, सरचिटणीस नाना शिलेदार, नगरसेवक कमलेश बोडके, जगदीश पाटील, मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ बोडके, ऋषिकेश आहेर, परशराम वाघेरे, संतोष जेजुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात त्यातीलच एक भाग म्हणजे मोफत दिनदर्शिका वाटप असल्याचे मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ बोडके यांनी सांगितले. कार्यक्रमास उमेश शिंदे, विशाल पवार,महेश कापडे,जयवंत बागुल,दामोदर शेलार,अनंत फुलमामडीकर,केशव नवले, विष्णू महाजन,सुधाकर बडगुजर, भूषण दराडे ,संतोष कारसुळकर, रामनाथ घुगे,पोपट धात्रक आदीसह नगरिक उपस्थित होते.

# मराठा आरक्षण मुंबई आंदोलनात जय बाबाजी परिवार सहभागी होणार

### नाशिक सकल मराठा क्रांती मोर्चा कमिटीने घेतली स्वामी शांतिगिरींची ओझर आश्रमात भेट

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मुंबई येथे मराठा आरक्षण लढा हा मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात सकल मराठा समाज एकत्रित लढत आहे. हा लढा जिंकण्यासाठी ऊर्जा व आशीर्वाद मिळावे म्हणून काल सकल मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने परम १००८ श्री स्वामी शांतिगिरीजी महाराज यांची भेट घेत दर्शन घेत आशीर्वाद घेण्यात आले.

त्याचबरोबर जय बाबाजी परिवार या मराठा आरक्षणाच्या लढाईमध्ये मुंबई येथील आंदोलनात सहभागी व्हावा याबाबत बाबाजींसमवेत चर्चा करण्यात आली.

बाबाजींनीही सांगितले आहे की, ज्या ठिकाणी चांगलं काम होत असेल त्या ठिकाणी बाबाजींचे आशीर्वाद नेहमीच असतात. या लढ्यालाही जय बाबाजी परिवार संपूर्णपणे सहकार्य करेल. लचांगले कर्म करणाऱ्याला कधीही अपयश येत नाही ही लढाई नक्कीच न्यायिक मार्गाने असल्याने मराठा समाजाला न्याय मिळेल व जय बाबाजी परिवार या लढ्यात स्वयंस्फूर्तीने मोठ्या संख्येने सहभागी होईल असे शुभाशीर्वाद उपस्थित शिष्टमंडळाला दिले. यावेळी मराठा क्रांती मोर्चा मधील जे उपोषणकर्ते आहेत त्यांच्या मुंबई येथील जेवणाची व्यवस्था जितकी शक्य होईल तितकी नाशिक जिल्ह्याच्या वतीने करण्यात येणार असल्याचे बाबाजींना सांगताच बाबाजींनीही सांगितले की, आश्रमाच्या वतीने ही होईल तेवढी शक्य मदत या अन्नछत्रासाठी देण्यात येईल. आशीर्वादरुपी ही मदत आपल्या शिष्टमंडळाने स्वीकारावी असे बाबाजींचे शिष्य श्री विष्णु महाराज सांगितले. लागलीच ही मदत पंचवटी येथील औदुंबर लॉन्स या ठिकाणी पोहोचविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाच्या वतीने बाबाजींचे आशीर्वाद घेऊन ऋण व्यक्त करण्यात आले. बाबाजींचे आशीर्वाद मिळाल्याने आता या लढ्याला बळ मिळाले असल्याचे उपस्थित शिष्टमंडळाने यावेळेस समाधान व्यक्त केले. यावेळी मराठा क्रांती मोर्चाचे सुनील बागुल, चंद्रकांत बनकर, करण गायकर, नानासाहेब बच्छाव, राजू देसले, योगेश नाटकर, सोमनाथ जाधव, वैभव दळवी, हर्षल पवार, विक्रांत देशमुख, संदीप कुठे, राम निकम, हार्दिक निगळ आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशकात ठाकरे गट ॲक्शन मोडवर; २२ जानेवारी हायजॅक करण्याचा प्रयत्न

### ड्राय डे, मटनाची दुकाने बंद ठेवून, सार्वजनिक सुट्टीची केली मागणी

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

अयोध्येत होणाऱ्या राम मंदिर उद्घाटन सोहळ्यानिमित्ताने नाशिक शहरात तो दिवस राष्ट्रीय सणासारखा साजरा करण्यात येणार आहे. त्याच अनुषंगाने २२ जानेवारी रोजी शिवसेना ठाकरे गटातर्फे नाशिकमधील काळाराम मंदिरात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आरती करण्यात येणार असल्याने त्यादिवशी ड्राय डे घोषित करावा तसेच चिकन व मटन विक्रीची दुकाने बंद ठेवावी तसेच सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी. या मागणीचे निवेदन शिवसेना ठाकरे गटातर्फे जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तांना देण्यात आले आहे.





> **प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेली नगरी म्हणून नाशिकची ओळख आहे. २२ जानेवारीला अयोध्येमध्ये श्रीराम मंदिर व प्रभू रामचंद्र यांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा होत आहे. या शुभ मुहूर्तावर अयोध्येप्रमाणेच नाशिक शहरात ठाकरे गटाकडून फटाक्यांची आतषबाजी, दीपोत्सव, विद्युत रोषणाई व राम मंदिरात आरती करून दिवाळी सारखा सण साजरा करण्यात येणार आहे. याकरीता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे नाशिकला येत असून काळाराम मंदिरात आरती करणार आहेत. निवेदनात शहरातील मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्यात यावीत. ड्रायडे जाहीर करावा. तसेच शासकीय कार्यालय व शाळांना सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी. अशी मागणी नाशिक जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्तांकडे करण्यात आली आहे.**
>
> **- सुधाकर बडगुजर,** महानगर प्रमुख, शिवसेना (ठाकरे गट)

याबाबत माहिती अशी की, शिवसेना ठाकरे गटातर्फे २२ जानेवारीला मंगलमय वातावरणात गोदातीरी उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आरतीही करण्यात येणार आहे. यानिमित्त ठिकठिकाणी विद्युत रोषणाई तसेच दीप प्रज्वलित करण्यात येणार आहेत. त्यामुळेच या दिवशी ड्रायडे घोषित करणे गरजेचे आहे. सर्व चिकन, मटन विक्रीची दुकाने बंद ठेवावीत. सिडको आणि सातपूर परिसरातील अवैध मांस विक्रीच्या दुकानांवर कारवाई करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. या दिवशी सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी कार्यालयांना, शाळांना सुट्टी जाहीर करावी. कायदा व सुव्यवस्थेचा विचार करून महानगर परिसरात पोलीस गस्त वाढवावी. असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर निवेदन शिवसेना उपनेते सुनील बागुल, जिल्हाध्यक्ष विजय करंजकर, महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर, दत्ता गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी बाळासाहेब कोकणे, सुभाष गायधनी, शैलेश सूर्यवंशी, महानगर समन्वयक, देवा जाधव, नीलेश साळुंके, सुनील जाधव, मसूद जिलानी, ईमरान तांबोळी, राजेंद्र वाकसरे, दीपक वाघ आदींनी दिले. नंतर या आशयाचे आणखी एक निवेदन पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनाही देण्यात आले.

# देवधर मंडळातर्फे दि.२८ रोजी तिळगुळ समारंभ, आनंदमेळावा

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

देवधर, दीक्षित, ढमढेरे या कौशिक गोत्री बंधू-भगिनींचे मध्यवर्ती देवधर मंडळ कार्यरत आहे. ५० वर्षे पूर्ण केलेल्या या मंडळाच्या नाशिक शाखेतर्फे रविवार दि.२८ जानेवारी रोजी तिळगुळ समारंभ व आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जुन्या आग्रा रोडवरील कालिका मंदिर सभागृहात होणाऱ्या या समारंभाचे अध्यक्षस्थान मंडळाचे अध्यक्ष सुरेश देवधर भूषवणार आहेत.

नाशिकसह महाराष्ट्रातून अनेक सभासद यावेळी उपस्थित राहणार आहेत राहतील. सकाळी ९ ते दुपारी ३ पर्यंत चालणाऱ्या या आनंद मेळाव्यात वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या सभासदांचे सत्कार केले जातील. विवाहाला ५० वर्षे पूर्ण झालेली दाम्पत्ये तसेच विशेष शैक्षणिक गुणवत्ता व नैपुण्य प्राप्त केलेल्या सभासदांचा व त्यांच्या पाल्यांचा गौरव करण्यात येणार आहे. यावेळी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम होईल. नाशिकमध्ये नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने नवीन आलेल्या देवधर, दीक्षित, ढमढेरे कुलबांधवांनी शुभांगी देवधर ९८९०२४०५२२ आणि संजय देवधर ९४२२२७२७५५ यांच्याशी संपर्क साधावा.

### विवाहितेचा १० लाखांसाठी छळ

**धुळे ।** देवपुरातील बिलाडी रोडवरील तिरुपती नगरात माहेर असलेल्या विवाहितेचा १० लाखांसाठी छळ करण्यात आला. या प्रकरणी २५ वर्षीय विवाहितेच्या तक्रारीवरून पती डॉ. अमोल रवींद्र पाटील, रवींद्र वामनराव पाटील, सुवर्णा रवींद्र पाटील, किरण दीक्षांत देसाई यांच्या विरोधात देवपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पटेल विद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

**शिरपूर।** तालुक्यातील भामपूर येथे आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात २०१७-१८ वर्षापर्यंतचे माजी विद्यार्थी सहभागी झाले. आपल्या शाळेबद्दलचे प्रेम त्यांच्या एकंदरीत संभाषणातून सर्व शिक्षकांना दिसून आले. मेळाव्यात उपस्थित विद्यार्थ्यांनी शाळेचा ग्रंथालयासाठी देणगी स्वरुपात निधी दिली. यावेळी माजी विद्यार्थी पूनम वसंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ए.ए.चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# बोरी नदी पट्ट्यात ३० कोटींतून रस्त्यांची कामे

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

तालुक्यातील बोरी नदी पट्ट्यातील विविध गावांमध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, नाबार्ड व राज्याच्या अर्थसंकल्पातील तरतुदीतून सुमारे ३० कोटींच्या निधीतून रस्त्यांची कामे मंजूर झाली आहेत. यातील काही कामे सुरू आहेत, तर काही लवकरच सुरू होतील.

यामुळे बोरी नदीपट्ट्यातील शेतीला बारमाही पाण्यासह रस्त्यांचे जाळेही निर्माण केले जात आहे. यातून शेतकऱ्यांसह ग्रामीण भागातील ग्रामस्थांची दळणवळणाची मोठी सोय होईल, असा विश्वास खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी व्यक्त केला. पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत विंचूर (ता. धुळे) येथे राज्यमार्ग १७ ते दोंदवाड ते विंचूर ते शिरूडदरम्यान खासदार डॉ. भामरे यांच्या प्रयत्नाने चार कोटी ४२ लाख ६२ हजार रुपये निधीतून मंजूर झालेल्या. रस्त्याचे तसेच दहा कोटी ८८ हजार रुपयांच्या निधीतून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर शिरूड-धामणगाव-निमगूळ-बाबरे रस्ताकामाचे भूमिपूजन व बोरी नदीवरील नाबार्डच्या साडेचार कोटी रुपयांच्या निधीतून बांधण्यात आलेल्या निमगूळ येथील पुलाचे उद्घाटन खासदार डॉ. भामरे यांच्या हस्ते झाले. खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष विजय



### आमदारांनी फुकटचे श्रेय घेऊ नये

**शिरूड येथील कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्य आशुतोष पाटील म्हणाले, की अनेक वर्षांपासून प्रलंबित शिरूड-धामणगाव-वणी-निमगूळ-बाबरे रस्त्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या टप्पा दोनअंतर्गत आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्यातून दहा कोटी ८८ लाख रुपये निधी मंजूर झाला. राज्यात व केंद्रात भाजपची सत्ता असून, पालकमंत्री गिरीश महाजन व खासदार डॉ. भामरे यांच्या पाठपुराव्याने निधी मंजूर करून आणला. धुळे ग्रामीणचे आमदार कुणाल पाटील यांनी परस्पर या कामाचे भूमिपूजन करून फुकटचे श्रेय घेऊ नये, असेही श्री. पाटील म्हणाले.**

गजानन पाटील, बोरकुंडचे माजी लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब भदाणे, जिल्हा परिषद सदस्य आशुतोष पाटील, सुधीर जाधव, राम भदाणे, प्रभाकर भदाणे, भाजप उद्योग आघाडीचे प्रदेश सहसंयोजक उत्कर्ष पाटील. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब देसले, तालुकाध्यक्ष देवेंद्र पाटील, तालुका सरचिटणीस शरद पाटील, पंचायत समितीचे माजी उपसभापती विद्याधर पाटील. सीएमजेएसवायचे अभियंता व्ही. एम. पाटील, बोधगावचे सरपंच अविनाश पाटील, खोरदडचे सरपंच शरद पाटील, नानाभाऊ पाटील, भटू पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. श्री. भदाणे म्हणाले, की खासदार डॉ. भामरे यांच्या प्रयत्नांमुळे बोरी पट्ट्यात २४ कोटींची कामे मंजूर आहेत. विकासासाठी निधी आणणारे एकीकडे व या कामांचे श्रेय घेणारे दुसरेच अशी स्थिती असल्याची टीकाही श्री. भदाणे यांनी केली.

# प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर महागात; बेकरी विक्रेत्यांना २० हजार दंड



**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महापालिकेला पुन्हा एकदा प्लॅस्टिक बंदी कायद्याची आठवण आली. पथकाने शहरातील साक्री रोडवरील चार बेकरी दुकानदारांवर कारवाई करत २० हजार रुपये दंड वसूल केला, तसेच सुमारे एक टन प्लॅस्टिक पिशव्याही त्यांच्याकडून जप्त केल्या. व इतर वस्तूंना बंदी घातली आहे. मात्र, या वस्तूंची सर्रास विक्री, वापर दिसून येतो. धुळे महापालिकेकडून अनेकदा याबाबत कारवाईचा बडगा उचलण्यात आला.

मात्र, एक-दोन दिवस कारवाई झाल्यानंतर पुन्हा या समस्येकडे कुणी लक्ष देत नाही. अशा बंदी घातलेल्या वस्तूंची विक्री, साठवणूक अथवा वापर करू नका, असे आवाहन महापालिकेकडून केले जाते. मात्र, त्याला कुणी घाबरत नाही. त्यामुळे पुन्हा या वस्तूंचा वापर सुरू होतो. दरम्यान महापालिकेच्या पथकाला पुन्हा कारवाईबाबत जाग आली. त्यातून पथकाने शहरातील साक्री रोडवरील बेकरी दुकानदारांकडे कारवाई केली. यात बाबा बेकरी, दीपक बेकरी, रमेश बेकरी व भाग्यश्रील बेकरी या दुकानांमध्ये प्लॅस्टिक कॅरिबॅगा आढळून आल्या. त्यामुळे या चारही दुकानदारांना प्रत्येकी पाच हजार रुपये दंड करण्यात आला. पथकाने चारही दुकानदारांकडून एकूण २० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. या दुकानांमधून सुमारे एक टन प्लॅस्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या. धुळे महापालिका आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील, उपायुक्त डॉ. संगीता नांदूरकर यांच्या निर्देशानुसार मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे. स्वच्छता निरीक्षक लक्ष्मण पाटील, चंद्रकांत जाधव, विकास साळवे, चेतन अहिरे, महेंद्र ठाकरे, संदीप मोरे, गजानन चौधरी, साईनाथ वाघ, रतन निरगुडे, शुभम केदार, एजाज शेख, आसिफ बेग, मनीष आघाव. गौरव माळी, प्रमोद चव्हाण, अख्तर शेख, संदीप वाघ, मुकादम जय किशन पिवाल यांच्या पथकाने ही कारवाई केली.



## आर.सी. पटेल विद्यालयात महावाचन महोत्सव

**होळनांथे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

येथील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत महावाचन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासाबरोबरच इतर लेखक व साहित्यिक वाचनात आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने वाचन कट्टा ही संकल्पना विद्यालयात राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य व्ही. आर. सुतार यांच्या हस्ते महावाचन महोत्सव समारंभाचे उद्घाटन संपन्न झाले. ॲडव्हान्स टेक्नॉलॉजीच्या जगात सुद्धा विद्यार्थ्यांमध्ये पुस्तक वाचण्याची प्रेरणा निर्माण व्हावी हा उदात्त हे तुम्ही आयोजित सदर कार्यक्रमास प्राचार्य व्ही . एस.सुतार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाचनाचे महत्त्व या संदर्भ मार्गदर्शन केले. तर व्ही. एस. मासरे व उमेश शिंदे यांनी काव्य गायन केले. सदर कार्यक्रमाला विद्यालयातील आर. आर. महाजन, श्रीमती सोनाली पाटील, सागर वारुळे, कुमारी वृषाली कासार, प्रेमचंद शिरसाठ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## जुनवणे येथील महिलेचा दुचाकीवरून पडून मृत्यू

**धुळे ।** तालुक्यातील गरताड येथील रेल्वेगेट जवळ खराब रस्ता व गतिरोधकमुळे मोटारसायकलवरून पडल्यामुळे गायत्री धनंजय शिंपी (वय ४३, रा. जुनवणे) या जखमी झाल्या. त्यांना खासगी रुग्णालयता दाखल केले. तीन दिवस त्यांच्यावर उपचार झाले. बुधवारी रात्री १० वाजता त्यांचा मृत्यू झाला. शिंपी या आजारी असल्यामुळे पतीसोबत मोटारसायकलवरुन येताना हा अपघात झाला.

## साक्री न्यायालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त कार्यक्रम संपन्न



**साक्री । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मा.उच्च न्यायालय, मुंबई व मा. माधुरी आनंद, प्रमुख जिल्हा न्यायाधीश, धुळे यांच्या आदेशान्वये व मा. श्री. संदीप स्वामी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतुने ''मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा' चे औचित्य साधुन आज रोजी साक्री न्यायालयात मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी शिबीर घेण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन न्यायाधीश आर. बी. डोळे हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन न्यायाधीश एन. एल. पाटील व साक्री तालुका वकिल संघाचे अध्यक्ष ॲड. वाय. पी. कासार होते. कार्यक्रमाचे प्रास्तावित करतांना ॲड. योगेश कासार यांनी त्यांचया भाषणात सांगितले की, आपण ज्या भाषेमध्ये बोलतो ते संवाद म्हणतात आणि संवाद प्रभावी माध्यम आहे. आपल्या विकासासाठी आपल्याला भाषा आयुष्यभर मदत करते व्यक्तीच्या विकासाबरोबर समाजाच्या विकास सुद्धा भाषेमुळेच होत असतो आणि हीच भाषा आपल्याला समाजामध्ये विचारवंत तत्त्वज्ञ लेखक कवी यांचा सहभाग करून घेण्यासाठी विकासामध्ये आपल्याला मोठं योगदान देत असते. मराठीची परंपरा राखली हे महान वैभव आपल्यापर्यंत येऊन पोचलेला आहे याचा आपल्याला अभिमान आहे आणि आपण मनापासून कृतज्ञता बाळगणे तेवढेच गरजेचे आहे शेतकरी, कामकरी आणि व्यावसायिक बांधवांनी ही परंपरा समृद्ध केलेले आहे हे वैभव आपल्याला सोन्यासारखं लाभलेला आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व समोराप श्री. योगेश शिरसाठ, व.लिपीक, दिवाणी न्यायालय, साक्री यांनी केले. यावेळी वकिल संघाचे सर्व विधीज्ञ, पक्षकार व न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## मातोश्री गुंताबाई आखाडे बहुउद्देशीय संस्थेस अतुल्य सेवा सन्मान पुरस्कार

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

धुळे येथील आय एम ऐ हॉल क्युमाईन क्लबसमोर ,जेलरोड धुळे येथे महा एनजीओ फेडरेशन पुणे सप्तशृंगी महिला बहुउद्देशीय संस्था धुळे तथा जोशाबा सांस्कृतिक क्रीडा मंडळ सोनगीर धुळे यांच्या विद्यमाने अतुल्य सेवा सन्मान पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. धुळे जिल्ह्यातील तसेच नंदुरबार, नाशिक, जळगाव, अहमदनगर मधील एकूण ३१ संस्थांना अतुल्य सेवा सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



महाऐनजीओ फेडरेशन पुणे यांचे वतीने दिला जाणारा अतुल्य सेवा सन्मान २०२४ पुरस्कार मातोश्री गुंताबाई आखाडे बहुउद्देशीय संस्था धुळे या संस्थेस जाहीर करण्यात आला होता सदर पुरस्कार. ऊत्तर महाराष्ट्र स्तरावर ३१संस्थांना जाहीर करण्यात आले होते. धुळे येथील मातोश्री गुंताबाई आखाडे बहुउद्देशीय संस्था धुळे,ह्या संस्थेस श्री शेखर मुंदडा अध्यक्ष, गोसेवा आयोग महाराष्ट्र शासन यांच्या हस्ते संस्थेला अतुल्य सेवा सन्मान पुरस्कार २०२४ मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला मातोश्री गुंताबाई आखाडे बहुउद्देशीय संस्था धुळे,डॉ.डी.एम. आखाडे अध्यक्ष सौ आशाताई डी आखाडे सचिव यांना पुरस्काराने गौरवण्यात आले.

## तारुण्यातच ध्येय साध्य करावे : डॉ. विसपुते




**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

तारुण्याच्या काळातच बुद्धी, क्षमता नि कार्यप्रवणता शिखरावर असते. त्यामुळे जीवनातील ध्येय साध्य करण्यासाठी या काळाचा विद्यार्थ्यांनी सदुपयोग करावा असे प्रतिपादन डॉ. देवेंद्र विसपुते यांनी विद्यावर्धिनी महाविद्यालयात केले.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लबतर्फे 'राष्ट्रीय युवा दिन' कार्यक्रमात डॉ. विसपुते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. राजवीरेंद्रसिंग गावित होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष खत्री, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ. बाजीराव पाटील, डॉ. मंजू तरडेजा उपस्थित होते. यानिमित्त रेड रिबन क्लब, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबविली कार्यक्रमात सूत्रसंचालन डॉ. बी एम पाटील व आभार प्रदर्शन डॉ. मंजू तरडेजा यांनी केले. याप्रसंगी डॉ मंगेश पाटील, डॉ राजीव आरके, सहा. प्रा. विजय पालवे, डॉ शुभांगी देशमुख, नयना गायकवाड, अर्चना वळवी, शीतल पावरा उपस्थित होते.

## विभागस्तरीय कराटे स्पर्धेत मॉन्स्टर फाईट क्लब संघ प्रथम क्रमांकावर

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

नुकत्याच झालेल्या नाशिक विभाग स्तरीय कराटे स्पर्धेमध्ये धुळे जिल्ह्यातील मॉन्स्टर फाईट क्लब या संघाने चमकदार कामगिरी करत प्रथम विजेता संघ हा बहुमान मिळवला. या क्लबच्या खेळाडूंनी सर्वात जास्त सुवर्णपदक मिळविले.

नंदुरबार येथे नुकत्याच विभाग स्तरीय कराटे स्पर्धा यशस्वीरित्या पार पडल्या. या स्पर्धेत नाशिक विभागातून १७० खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धांमध्ये धुळे जिल्ह्यातील मॉन्स्टर फाईट क्लबने वर्चस्व दाखवत चमकदार कामगिरी केली. या क्लबला विभागातून प्रथम विजेता संघ हा बहुमान मिळाला. या क्लबने सर्वात जास्त पदके मिळविली.

प्रणव पांडुरंग खरात, केयांश अंकित तायल, मनवा दीपक बोरसे, अनन्या प्रवीण वाघ, अमृता प्रशांत भिल्ला, सोहम प्रल्हाद सूर्यवंशी, देशू संतोष परदेशी, हर्षल धनराज देवरे, पार्थ पवन दुसाने, ओम जगदीश राणा, जय जगदीश राणा, तन्मय अविनाश पाटील, वीरा संतोष परदेशी, जान्हवी संतोष नेरकर,जान्हवी अविनाश सोनवणे, निधी दिनेश शर्मा, सुखमनप्रीत कौर, रमनदीप सिंह बक्षी या खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावले. खेळाडूंच्या या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यात त्यांचे कौतुक होत आहे. खेळाडूंना मॉन्स्टर फाईट क्लबचे संचालक व प्रशिक्षक श्री राहुल डी बर्वे यांचे मार्गदर्शन लाभले.

## शिंदखेडा तालुक्यातील सहा गावात विकसित भारत संकल्प यात्रा

**धुळे । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचे लाभ लक्षित वंचित लाभार्थीपर्यंत पोहोचावेत, यासाठी केंद्र शासनाच्या वतीने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम आखण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेले मात्र अद्याप ज्यांना लाभ मिळू न शकलेल्या पात्रताधारक व्यक्तिंपर्यंत केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ पोहोचावा म्हणून केंद्र शासनातर्फे धुळे जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार शिंदखेडा तालुक्यातील आच्छी, हिसपूर,कामपुर, सोनशेलू, दराने, रोहने या ग्रामपंचायतीमध्ये विकसित भारत संकल्प यात्रा उत्साहात संपन्न झाली.यावेळी मेरी कहानी मेरी जुबानी अंतर्गत लाभार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी यात्रेचे स्वागत ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले.या कार्यक्रमांस सरपंच,उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, लोकप्रतिनिधी, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, आशा वर्कर, बचत गट अध्यक्ष, ग्रामस्थ व लाभार्थी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## जागतिक कृषी महोत्सवाचा भूमिपूजन सोहळा

### २४ ते २८ जानेवारी दरम्यान शेती, पूरक व्यवसायांची मिळणार माहिती

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

दिंडोरीप्रणीत स्वामी समर्थ सेवा मार्गाचा जागतिक कृषी महोत्सव डोंगरे वसतिगृह मैदानावर येत्या २४ ते २८ जानेवारी दरम्यान होणार आहे. मंडप उभारणी भूमिपूजन सोहळा सोमवारी (दि. १५) मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात झाला.

याप्रसंगी त्र्यंबकेश्वर गुरुपीठाचे व्यवस्थापक चंद्रकांतदादा मोरे, भाजपचे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, शिवसेना उपनेते सुनील बागुल, के.व्ही. एन.नाईक शिक्षण सस्थेचे अध्यक्ष पंढरीनाथ थोरे आदी उपस्थित होते. दरम्यान पाच दिवसांच्या कालावधीत होणाऱ्या या शेतकरी हिताच्या भव्य कार्यक्रमाबाबत माहिती देण्यासाठी भूमिपूजन



सोहळ्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत सेवामार्गाचे कृषिशास्त्र विभागाचे समन्वयक आबासाहेब मोरे यांनी माहिती दिली. ते म्हणाले की लाखो शेतकरी, सेवेकरी, भाविक, विद्यार्थी, कृषी अभ्यासक, संशोधक, व्यापारी, संस्था, लहान मोठे उद्योजक हे वर्षभर या महोत्सवाची वाट पाहत असतात. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असे की, गेल्या दोन महिन्यांपूर्वी नंदुरबार येथे सेवामार्गाच्या वतीने झालेल्या विभागीय कृषी महोत्सवाच्या माध्यमातून लाखो शेतकऱ्यांना नवी उमेद मिळाली आहे. नाशिक महानगरात होणाऱ्या या जागतिक कृषी महोत्सवात पाच दिवसांत भारतभरातील लाखोंच्या संख्येने शेतकरी, कृषी अभ्यासक तसेच इतर क्षेत्रातील मान्यवर यांच्यासह बाहेर देशातील तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत अशी माहितीही विश्वास मोरे यांनी दिली. या प्रदर्शनादरम्यान दुग्धव्यवसाय व स्वयंरोजगार अंतर्गत रोजगाराची संधी सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींची नाव नोंदणी करून मार्गदर्शन करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, महिला सक्षमीकरण अंतर्गत हस्तकला, पाककला, गृहउद्योग या संदर्भात मार्गदर्शन केले जाणार आहे. शेतकरी बांधवांसाठी सेवामार्गाच्या सात्त्विक कृषिधन निर्मिती अंतर्गत सात्त्विक शेतमालाची बाजारपेठ उपलब्ध करून देणे, विद्यार्थी व सुशिक्षित बेरोजगारांना कर्तृत्ववान, स्वावलंबी बनविण्यासाठी मार्गदर्शन हे यंदाच्या महोत्सवाचे खास आकर्षण आहे. जास्तीत-जास्त शेतकरी, युवक-युवती, बेरोजगार तरुण-तरुणी तसेच नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहनही आबासाहेब मोरे यांनी यावेळी केले आहे.

## राजे छत्रपती मार्शल आर्ट इंग्लिश स्कूल येथे क्रीडा दिवस साजरा

**पिंपळनेर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

ऑलिंपिक पदक विजेता खेळाडू पैलवान खाशाबा जाधव यांचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. तसेच राजे छत्रपती मार्शल आर्ट इंग्लिश मिडियम पब्लिक स्कूल पिंपळनेर येथे क्रीडा दिन व युवा सप्ताहचे औचित्य साधून सकाळच्या सत्रात सामूहिक सूर्यनमस्कार व योगासनचा कार्यक्रम घेण्यात आला.

सदर कार्यक्रमाला पिंपळनेर केंद्राचे माजी केंद्रप्रमुख शिरीष कुवर यांनी सर्व उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना योगासनाचे मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संभाजीराव अहिरराव, मुख्याध्यापिका सोनाली पाटील, शिक्षक कर्मचारी वृंद व सर्व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. सदर क्रीडा स्पर्धा या ११वर्षे वयोगट, १४ वर्षे वयोगट आणि १८ वर्षे गट या तीन गटांमध्ये घेण्यात आल्या. स्पर्धेला एकूण तब्बल १७८ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. सदर स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेतील अमोल अहिरे, बालासाहेब गायकवाड तसेच शाळेतील शिक्षक शेख, यांचे सहकार्य लाभले. जिंकलेल्या सर्व खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष तसेच संभाजी शिवाजी अहिरराव व श्री रा.ना.पाटील, सोनाली पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
शुक्रवार दि. १९ जानेवारी २०२४





# आनंद लोंढेच्या नेतृत्वात आजाद कार्यकर्त्यांचं आंदोलन

## बंद विनोद वाईन शॉपच्या बोर्डाची तोडफोड



















धुळे

। डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शहर पोलिस स्टेशन समोर उभारलेला पुतळाच अनधिकृत असल्याचे सांगणार्या विनोद वाईन शॉपचे मालक गलानी यांच्याविरुध्द अॅट्रासिटीचा गुन्हा दाखल करा, आज आम्ही विनोद वाईन शॉपचा बोर्ड फोडला. येत्या पाच दिवसांच्या आत हे दुकान येथून हटवा अन्यथा दुकान ज्या दिवशी चालू राहील, त्या दिवशी फोडले जाईल. हे दुकान हटविले नाही तर पालकमंत्र्यांना २६ जानेवारीला झेंडावंदन करु देणार नाही, सामुहिक आत्मदहन करु असा इशारा आनंद लोंढे यांनी दिला आहे. आज आंबेडकरी अनुयायांसोबत लोंढे विनोद वाईन शॉप येथे आले. लोंढे यांचे आंदोलन नियोजीत असल्याने आधीच तगडा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. विविध सामाजीक संघटनांचे आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने आंदोलनासाठी आले होते. त्यांच्या भावना तिव्र होत्या. रेड्डी यांनी सांगितले की २३ तारखेला वाईनशॉपच्या बाबतीत जिल्हाधिकारींकडे बैठक आहे. त्याआधी कायदा हातात घेणे योग्य नव्हते. महिन्याच्या अखेर वाईन शॉप बंद होणार अशी कठोर कारवाई करु असे सांगितल्यावर देखील त्यांनी त्या ठिकाणी जाऊन तोडफोड केली. कायदा हातात घेऊन खूप मोठी चूक केली आहे. असे रेड्डी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# आज बोर्ड फोडला, यापुढे दुकान फोडू : आंनद लोंढे यांचा इशारा

## आंनद लोंढे यांच्या सहित अनेक भिम अनुयायी पोलिसांच्या ताब्यात





























धुळे

। डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शहर पोलिस स्टेशन समोर उभारलेला पुतळाच अनधिकृत असल्याचे सांगणार्या विनोद वाईन शॉपचे मालक गलानी यांच्याविरुध्द अॅट्रासिटीचा गुन्हादाखल करा, आज आम्ही विनोद वाईनचा बोर्ड फोडला. येत्या पाच दिवसांच्या आत हे दुकान येथून हटवा अन्यथा दुकान ज्या दिवशी चालू राहील, त्या दिवशी फोडले जाईल. हे दुकान हटविले नाही तर पालकमंत्र्यांना २६ जानेवारीला झेंडावंदन करु देणार नाही, सामुहिक आत्मदहन करु असा इशारा आनंद लोंढे यांनी दिला आहे. आंबेडकरीअनुयायांसोबत लोंढे विनोद वाईन शॉप येथे आले. लोंढे यांचे आंदोलन नियोजीत असल्याने आधीच तगडा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. विविध सामाजीक संघटनांचे आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने आंदोलनासाठी आले होते. त्यांच्या भावना तिव्र होत्या. आंदोलकांपैकी काहींनी काठ्यांनी विनोद वाईन शॉपचे बोर्ड फोडले.त्यानंतर माध्यमांशी बोलताना आनंद लोंढे म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून सामाजीक, राजकीय संघटनांमधील आंबेडकर अनुयायांनी विनोद वॉईन शॉप हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यामागील दुकान हटविण्यासंदर्भात निवेदने दिली. आंदोलने केली. आंदोलने केली. २०२३ साल उलटून देखील हे दुकान हटलेले नाही. विनोद वाईन शॉपचे मालक नरेश गलाणी हे मात्र डॉ.आंबेडकर यांचा पुतळाच बेकायदेशिर ठरवत आहे.त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासनाने अॅट्रासिटीचा गुन्हा दाखल करावा. आज आम्ही दुकानाचे बोर्ड फोडले आहे. येत्या पाच दिवसात दुकान येथून हलवावे या पाचदिवसात दुकान केव्हाही चालु दिसले तर आम्ही दुकान फोडू. अशी घोषणा केली. आंदोलनानंतर निवेदन देण्यासाठी आंबेडकरी जनतेने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न केला असता त्यांना तेथेच पोलिसांनी अडविले. त्यानंतर त्यांना ताब्यात घेतले.

संकलन : दिपक वाघ